क्रमांक:एमआयएस-०६१६/सीआर-९०/२०१६/तीन दिनांक :- १० मे, २०१८

# घोषणा

**विषय**:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब पूर्व परीक्षा-२०१८
लेखनिकाची मदत घेण्याच्या व/किंवा अनुग्रह कालावधी घेण्याच्या परवानगीबाबत.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब पूर्व परीक्षा-२०१८ करीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील तरतुदीनुसार प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र विकलांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करणे आवश्यक आहे. तसेच, आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही, असेही जाहिराती मध्येच स्पष्ट करण्यात आले आहे.

**२**. आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता विकलांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘विकलांग व्यक्ती’ या सदरामध्ये दिनांक १ मार्च, २०१८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**३.** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब पूर्व परीक्षा-२०१८ करीता लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याकरीता आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आयोगास अर्ज सादर करणा-या उमेदवारांनाच लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील, असे आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार विषयांकित परीक्षेकरीता आयोगास आवश्यक प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करणा-या आणि लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधीसाठी आयोगाच्या कार्यालयाकडून परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘विकलांग व्यक्ती’ या सदराखालील ‘प्रवेश दिलेल्या उमेदवारांची यादी’मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहेत. तसेच, सदर उमेदवारांना त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत इमेल आयडीद्वारेही कळविण्यात आले आहे.

**४.** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये नाव असणा-या उमेदवारांनाच विषयांकित परीक्षेकरीता लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील. ऐनवेळी कोणत्याही उमेदवारास लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.